



भालबा केळकर

# पीडीए- एक वेध

■ शशिकांत कुलकर्णी

**'पी**डीए' या संक्षिप्त नावाने लोकप्रिय असलेली प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन ही संस्था १९ ऑक्टोबर १९५१ रोजी स्थापन झाली. पीडीएचे संस्थापक–अध्यक्ष प्रा. भालबा केळकर हे होते तर त्यांच्याबरोबर संस्था स्थापनेत डॉ. श्रीराम लागू, केशव घुले, तारापती घारपुरे, जयंत धर्माधिकारी, श्रीधर लिमये इत्यादींचा महत्त्वाचा सहभाग होता.

गेल्या ५३ वर्षांच्या कालावधीत पीडीएने सुमारे ७२ नवीन नाटकांचे प्रयोग रंगभूमीवर सादर केले. याखेरीज अनेक जुन्या नाटकांचेही प्रयोग वेगळ्या दृष्टिकोनातून सादर केले. यात प्रामुख्याने गद्य नाट्यकृतींबरोबरच भावबंधन, शारदा, संशयकल्लोळ, मीरा मधुरा, प्रेमसंन्यास अशा संगीत नाटकांचेही प्रयोग आहेत.

१९५० च्या सुमारास वैचारिक नाट्यप्रयोग सादर करून मराठी रंगभूमीला चैतन्य देण्याचे आणि मराठी प्रेक्षकांच्या नाट्यविषयक जाणिवा वाढविण्याचे महत्त्वाचे कार्य ज्या मोजक्या प्रायोगिक नाट्यसंस्थांनी केले त्यात पीडीएचे योगदान फार महत्त्वाचे मानले जाते. जगन्नाथाचा रथ, वेड्याचे घर उन्हात, पवनाकाठचा धोंडी, देवांचे मनोराज्य अशा पीडीएच्या सुरुवातीच्या काळातल्या नाट्यकृतींमुळे मराठी रंगभूमीच्या वाटचालीला निश्‍चित दिशा मिळाली होती यात शंका नाही. पीडीएच्या ५३ वर्षांच्या प्रवासात पुढे अशा अनेक नाटकांचे प्रयोग रंगभूमीवर येत राहिले. ते अगदी अलीकडच्या 'तलेदंड' या गिरीश कर्नाड यांनी लिहिलेल्या नाटकापर्यंत.

प्रयोगशील नाट्यकृती सादर करण्याच्या पीडीएच्या उपक्रमात गो.नी. दांडेकर, वसंत कानेटकर, व्यंकटेश माडगूळकर, शं.गो. साठे, वसंत वरखेडकर, ग.ल.ठोकळ, सरिता पदकी, अनिल जोगळेकर, दि.बा. मोकाशी, विद्याधर पुंडलिक, ल.ग.देव, ज्योत्स्ना देवधर, श्री.पु. गोखले, रा.शं. दातार, चं.प्र.देशपांडे अशा नवीन नाटककारांचा जाणीवपूर्वक सहभाग राहिला आहे.

पीडीएच्या अर्धशतकी वाटचालीत अनेक कलाकारांनी पीडीएच्या रंगभूमीवर विविध भूमिका केल्या. त्यात प्रामुख्याने श्रीराम खरे, सेवा चौहान, जब्बार पटेल, सुहास जोशी, रोहिणी हट्टंगडी, अरुण जोगळेकर, सई परांजपे, सुलभा पंचवाघ, दत्ता कळसकर, मोहन आगाशे, अजित सातभाई, श्रीधर राजगुरू, वासुदंव पाळंदे अशा अनेक नामवंतांचा त्यात समावेश आहे. ही यादी सुमारे दीडशे कलावंतांची आहे.

यानिमित्ताने एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते ती अशी की, पीडीएला

गुणी कलावंतांची उणीव कधी भासली नाही. त्याचे प्रमुख कारण पीडीए प्रतिवर्षी आयोजित करीत असलेले नाट्यशिबीर. विशेषत: महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी १५ मे ते ६ जून या कालावधीत पीडीए एक नाट्यशिबीर आयोजित करते. या शिबिरातूनच निवडक मुले-मुली पीडीएमध्ये काम करू लागतात. त्यामुळे पीडीएमध्ये सतत तरुण मुलामुलींचा सहभाग असतो. गेली सुमारे सतरा वर्षे आयोजित होत असलेल्या या शिबिरात डॉ. श्रीराम लागू, अमोल पालेकर, दिलीप प्रभावळकर, चित्तरंजन कोल्हटकर, प्रतिमा कुलकर्णी, सुहास जोशी, सतीश आळेकर, समर नखाते, अरुणा ढेरे, आनंद माडगूळकर, श्रीकांत मोघे, सुधीर मोघे असे अनेक नामवंत अभ्यासक शिबिरार्थींना मार्गदर्शन देण्यासाठी उपस्थित होते.

नाट्यशिबिरातील निवडक गुणी तरुण पुढे पीडीएमध्ये काम करू लागले. पीडीए सतत कार्यरत राहण्यासाठी अशा तरुणपिढीचा आणि त्यातूनच निर्माण होत असलेल्या नेतृत्वाचा अतिशय लक्षणीय उपयोग होतो. सध्या कार्यरत असलेल्या अशा पीडीएतील रंगकर्मींची नावे इथे उद्धृत करणे आवश्यकच आहे. दिलीप वेंगुर्लेकर, प्रदीप वैद्य, नितीन फडके, रूपाली भावे, मोहित टाकळकर, मैथिली पागे, आशिष वझे ही अगदी प्रतिनिधिक नावे आहेत. नाट्यशिबिराचे आयोजन, नवीन नाट्यप्रयोगाचे दिग्दर्शन, तालमीची व्यवस्था, प्रयोगव्यवस्था, नेपथ्य, प्रकाशयोजना अशा विविध क्षेत्रांत या रंगकर्मींचा फार मोलाचा आणि निरपेक्ष सहभाग असतो.

पीडीएच्या वाटचालीत अगदी अलीकडे म्हणजे तीन वर्षांपूर्वी दिल्ली येथील 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा' या नाट्यशिक्षण संस्थेच्या सहकार्याने एक हिंदी नाटक सादर करण्यात आले. प्रसिद्ध नाटककार अभिराम भडकमकर यांनी लिहिलेल्या 'प्रश्नोपनिषद' या हिंदी नाटकाचा देखणा प्रयोग तेथे सादर केला गेला.

पीडीएने सादर केलेल्या वेगवेगळ्या नाटकांचे प्रयोग आजपर्यंत महाराष्ट्रात अनेक ठिकाणी झाले आहेत. पण महाराष्ट्राबाहेर कोलकता, टाटानगर, रायपूर, इंदोर, जबलपूर, बंगलोर, मद्रास, हैद्राबाद, भोपाळ, दिल्ली, जयपूर इ. प्रमुख शहरांतील महाराष्ट्र मंडळांच्या निमंत्रणावरून त्या ठिकाणी विविध नाट्यप्रयोग झाले आहेत. याशिवाय भारताबाहेर

**१९५० च्या सुमारास वैचारिक नाट्यप्रयोग सादर करून मराठी रंगभूमीला चैतन्य देण्याचे आणि मराठी प्रेक्षकांच्या नाट्यविषयक जाणिवा वाढविण्याचे महत्त्वाचे कार्य ज्या मोजक्या प्रायोगिक नाट्यसंस्थांनी केले त्यात पीडीएचे योगदान फार महत्त्वाचे मानले जाते.**

कोरियातील सेओलमध्ये आयोजित केल्या गेलेल्या आंतरराष्ट्रीय नाट्यमहोत्सवात भारताचे प्रतिनिधी म्हणून पीडीएने व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'संती' या नाटकाचा प्रयोग सादर केला होता. त्यानंतर कॅनडातील टोरंटोमधील महाराष्ट्र मंडळाच्या निमंत्रणावरून 'घेतलं शिंगावर' आणि 'संगीत मीरा मधुरा' या दोन नाटकांचे प्रयोग सादर केले होते.

'प्रेमा तुझा रंग कसा', 'नांदा सौख्यभरे', 'अखेर पाय मातीचेच' या नाटकांचे प्रयोग सध्या पीडीए सादर करीत आहे. पैकी 'प्रेमा तुझा रंग कसा' या नाटकाचे साडेपाचशे प्रयोग केले आहेत. हे नाटक पीडीएनेच प्रथम रंगमंचावर आणले.

पीडीए ही पूर्णपणे हौशी नाट्यसंस्था आहे. कलाकारांना कोणत्याही प्रकारचे मानधन दिले जात नाही आणि त्यांच्याकडूनही संस्था कोणत्याही स्वरूपात आर्थिक अपेक्षा बाळगत नाही. प्रसंगी स्वत:च्या खिशातून पैसे खर्च करून पीडीएचे कलाकार काम करीत असतात. पीडीएत काम करायला मिळणे ही अभिमानाची बाब समजली जाते. एकमेकांवरील आणि संस्थेवरील अपार विश्वासावर ही संस्था गेली ५३ वर्षे मराठी रंगभूमीवर अव्याहत कार्य करीत आहे आणि यापुढेही करीत राहील.

स्थापनेपासून आजपर्यंत पीडीएने अनेक प्रथम क्रमांकांची पारितोषिके मिळवली आहेत. गेल्या वर्षी २००४ मध्ये रशियन नाटककार अन्तोन चेखव या जगप्रसिद्ध नाटककाराच्या शंभराव्या स्मृतिदिनानिमित्त चेखवच्या 'मॅरेज प्रपोजल' या नाटिकेचा मराठी अनुवाद 'मनोमिलन' रंगभूमीवर सादर केला. किरण यज्ञोपवित या तरुण रंगकर्मीने लेखन आणि दिग्दर्शन केले. या नाटिकेने विविध स्पर्धांमध्ये प्रथम पारितोषिक मिळवून सर्वोत्कृष्ट नाटिका म्हणून अपूर्व लोकप्रियता मिळवली.

पीडीएच्या नाट्यप्रयोगात काम करणारे सगळेच कलाकार व्यावसायिक नसल्यामुळे ते सर्वपरिचित किंवा लोकप्रिय असे नाहीत. पण पीडीएचे नाट्यप्रयोग अतिशय शिस्तबद्ध आणि देखण्या स्वरूपात, प्रामाणिकपणे सादर केले जातात हे निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्थापनेपासूनच पीडीएचा हा लौकिक आजही कायम आहे.

वस्तुत: पीडीए या नाट्यसंस्थेचा अर्धशतकी वाटचालीचा इतिहास हा एका ग्रंथाचा विषय आहे. तथापि लेखन मर्यादा लक्षात घेऊन हा एक अल्प स्वरूपात परिचय देण्याचा प्रयत्न आहे. सेओल आणि टोरँटो या परदेश दौऱ्यानंतर अमेरिका दौऱ्याची संधी मिळेल अशी एक इच्छा या निमित्ताने पीडीए व्यक्त करीत आहे.

अधिक माहितीसाठी संस्थेच्या वेबसाईटला अवश्य भेट द्या. www.pdapune.org.

■

**शशिकांत कुलकर्णी**
a_nike_t@hotmail.com